**नागपूर महानगर पालिका क्षेत्रातील शिधावाटप परिमंडळ कार्यालयांच्या कार्यक्षेत्राची विधानसभा मतदारसंघ निहाय फेररचना करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आस्थाप्र-३११२/प्र.क्र.२६९/नापु-१५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ जानेवारी, २०१३.

**वाचा :-** शासन निर्णय क्रमांक :आस्थाप्र-३११०/प्र.क्र.५४९/नापु-१५, दिनांक ३१ मे, २०१२.

**प्रस्तावना** :-

नागपूर महानगर पालिका क्षेत्रामध्ये शिधावाटप परिमंडळ कार्यालयांचे क्षेत्र सन १९७५च्या परिसिमनानुसार महानगरपालिकेच्या ७५ वार्डात कार्यरत होते. कामठी नगर परिषद व कँटोनमेंट बोर्ड हे क्षेत्रसुध्दा नागपूर शहर पुरवठा विभागाच्या अखत्यारीत होते. या विभागाच्या दिनांक ३१ मे २०१२च्या शासन निर्णयानुसार कामठी नगर परिषद व कँटोनमेंट बोर्ड हे क्षेत्र नागपूर शहर पुरवठा विभागाच्या अखत्यारीतून वगळून जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाने सन २००६ मध्ये विधानसभा मतदारसंघांचे नव्याने परिसीमन केले आहे. त्यानुसार नागपूर शहरातील महानगरपालिकेचे क्षेत्र १३६ वॉर्डात व ६ विधानसभा मतदारसंघात विभागले गेले आहे. सध्या नागपूर शहरातील एका परिमंडळ कार्यालयाच्या क्षेत्रात नविन परिसीमनानुसार २ ते ३ विधानसभा मतदारसंघाचा अंशतः समावेश होत आहे. त्यामुळे जनतेला व लोकप्रतिनिधींना आपली कामे कोणत्या परिमंडळ क्षेत्राशी संबंधित आहेत, याबाबत संभ्रम असून अडचणी निर्माण होत आहेत. रास्त भाव दुकानांची परिमंडळनिहाय दक्षता समितीची स्थापना करताना प्रत्येक परिमंडळात २ ते ३ विधानसभा सदस्यांचे क्षेत्र येत असल्यामुळे अशासकीय सदस्यांच्या नावाची शिफारस करताना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे नागपूर शहरातील शिधावाटप परिमंडळ हे विधानसभा मतदारसंघाच्या नविन परिसीमन क्षेत्रानुसार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन आता शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** :-

भारत परिसीमन आयोग यांची दिनांक ३१ जुलै, २००६ ची अधिसूचना व महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) दिनांक ३१ जुलै, २००६ अन्वये नागपूर जिल्ह्यातील नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत ६ विधानसभा मतदारसंघ निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार नागपूर जिल्हयातील शहर पुरवठा विभागांतर्गत नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील भारत परिसीमन आयोगाने ठरवून दिलेले विधानसभा मतदारसंघ क्षेत्र समाविष्ट करण्यात येत असून नविन परिमंडाळाचे नाव व कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे राहील. :-

| अ.क्र. | परिमंडळ कार्यालयाचे नांव | विधानसभा मतदार संघ | नागपूर महानगर पालिकेतील समाविष्ट क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | अ –परिमंडळ | ५२- नागपूर दक्षिण पश्चिम | विधानसभा मतदार संघातील संपूर्ण म.न.पा. क्षेत्र |
| २ | ब –परिमंडळ | ५३- नागपूर दक्षिण | विधानसभा मतदार संघातील संपूर्ण म.न.पा. क्षेत्र |
| ३ | क –परिमंडळ | ५४- नागपूर पूर्व | विधानसभा मतदार संघातील संपूर्ण म.न.पा. क्षेत्र |
| ४ | ड –परिमंडळ | ५५- नागपूर मध्य | विधानसभा मतदार संघातील संपूर्ण म.न.पा. क्षेत्र |
| ५ | ई –परिमंडळ | ५६- नागपूर पश्चिम | विधानसभा मतदार संघातील संपूर्ण म.न.पा. क्षेत्र |
| ६ | फ –परिमंडळ | ५७- नागपूर उत्तर | विधानसभा मतदार संघातील संपूर्ण म.न.पा. क्षेत्र |

२. नव्याने स्थापन करावयाच्या परिमंडळ कार्यालयासाठी सद्य:स्थितीत नागपूर अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचे मधून आवश्यक तेवढया अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यासाठी कोणत्याही प्रकारे नवीन पद निर्माण केले जाणार नाही. तसेच नवीन कार्यालय सुरु करण्यासाठी वाढीव खर्च मंजूर केला जाणार नाही.

३.	जिल्हाधिकारी, नागपूर यांनी परिच्छेद- १ मध्ये नमूद केल्या प्रमाणे परिमंडळ कार्यालयांची पुनर्रचना करावी. रास्तभाव दुकानांचे / केरोसीन परवान्यांचे ठिकाण आवश्यकतेनुसार व कार्यक्षेत्रानुसार अन्नधान्य वितरण अधिका-यांच्या स्तरावर बदलण्यात यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१३०११७१२२२२७७२०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( का.जा.धलपे )
शासनाचे अवर सचिव

प्रत,

१) महालेखापाल (२), लेखा व अनुज्ञेयता, नागपूर.

२) विभागीय आयुक्त, नागपूर.

३) जिल्हाधिकारी, नागपूर.

४) उप आयुक्त (पुरवठा), नागपूर.

५) अन्नधान्य वितरण अधिकारी, नागपूर.

६) जिल्हा पुरवठा अधिकारी, नागपूर.

७) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.

८) विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी.

९) मा.मंत्री (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव.

१०) मा.राज्यमंत्री (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण) यांचे खाजगी सचिव.

११) निवडनस्ती.